**ठळक बातम्या**

- दीपावलीचा सण मानवतेचा अमूर्त वारसा म्हणून घोषित
- ॲमेझॉन भारतात २०३० पर्यंत ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करणार
- अमृत भारत रेल्वे स्थानक योजने अंतर्गत देशभरात १६० रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास झाल्याचं सरकारचं लोकसभेत निवेदन
- महाराष्ट्रात इलेक्ट्रिक वाहनांसाठीची टोलमाफी येत्या आठ दिवसात लागू करावी, असे विधानसभा अध्यक्षांचे शासनाला निर्देश

**आणि**

- गडचिरोलीत ११ नक्षली अतिरेक्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><>**

भारतभर साजरा केला जाणारा दीपावलीचा सण आता मानवतेचा अमूर्त वारसा बनला आहे. युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीत दिवाळीचा समावेश केल्याचं दिल्लीत सुरु केलेल्या युनेस्कोचं २० व्या अधिवेशनात केंद्रीय सांस्कृतिक कार्य मंत्री गजेंद्र सिंग शेखावत यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. ही बातमी समजल्यावर देशात आणि जगभरातल्या भारतीय समुदायात आनंद व्यक्त करण्यात येत आहे. दीपावली हा केवळ सण नाही तर आपल्या संस्कृती, परंपरा आणि जीवनमूल्यांशी जोडलेली दृढ भावना असल्याचं सांगत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमांवर आनंद व्यक्त केला आहे. परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनीही या घोषणेबद्दल समाधान व्यक्त केलं आहे.

यापूर्वी रामलीला, दुर्गापूजा आणि इतर अनेक भारतीय परंपरांचा तसंच पारंपरिक  कौशल्यांचा समावेश या यादीत झाला आहे.

<><><><><>

अमेरिकेतला मोठा उद्योगसमूह ॲमेझॉनने भारतात २०३० पर्यंत ३५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. कंपनीचे  उपाध्यक्ष अमित अगरवाल यांनी आज नवी दिल्लीत आयोजित ॲमेझॉन संभव परिषदेत ही घोषणा केली. विकसित भारताच्या उद्दिष्टांशी ॲमेझॉनची प्रगती सुसंगत असल्याचं सांगून ते म्हणाले की या गुंतवणुकीतून १० लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती होईल.कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात क्षमतावाढ, दळणवळण आणि इतर पायाभूत सुविधाविकास, रोजगारनिर्मिती आणि लहान उद्योगांना पाठिंबा ही या गुंतवणुकीची उद्दिष्टं असतील. याआधी मायक्रोसॉफ्टने १७ अब्ज डॉलर्स गुंतवणुकीची घोषणा केली आहे.

<><><><><>

अमृत भारत रेल्वे स्थानक योजने अंतर्गत देशभरात आतापर्यंत १६० रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास करण्यात आला असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. संसदेच्या हिवाळी अधिवेशनात लोकसभेत प्रश्नोत्तराच्या तासात एका पुरवणी प्रश्नाला उत्तर देताना ते आज बोलत होते.  भाजपाचे गोडम नागेश आणि समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांनी यासंदर्भात प्रश्न विचारला होता. या योजने अंतर्गत एक हजार ३०० स्थानकांचा विकास केला जाईल, तसंच प्रवाशांसाठी सोयी सुविधा तयार केल्या जातील, असं वैष्णव म्हणाले.

**होल्ड बाईट वैष्णव**

**गेल्या** अकरा वर्षांत देशभरात दहा हजार १७० टपाल कार्यालयं उभारण्यात आल्याचं केंद्रीय दळणवळण मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी आज लोकसभेत सांगितलं. भारताची टपाल यंत्रणा जगातल्या सर्वात मोठ्या टपाल यंत्रणांपैकी एक असून देशभरात १ लाख ६४ हजार टपाल कार्यालयं आहेत, असं त्यांनी सांगितलं.

टपाल यंत्रणा सक्षम करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे, गेल्या तीन वर्षांत नक्षलग्रस्त जिल्ह्यांमध्ये ९०३ नवी टपाल कार्यालयं उघडण्यात आली. बँका नसलेल्या गावांमधे पाच हजार ७४६ टपाल कार्यालयं मंजूर झाली असून त्यापैकी ६५७ कार्यालयं सुरू झाल्याचं शिंदे यांनी सांगितलं.

**२०३०** पर्यंत १० कोटी टन कोळशापासून इंधन वायू निर्मिती प्रकल्पाचं उद्दिष्ट सरकारने ठेवलं असून यासाठी ८५ हजार कोटी रुपये खर्च येणार असल्याचं केंद्रीय कोळसा मंत्री सतीशचंद्र दुबे यांनी लोकसभेत एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितलं. देशातल्या सात इंधन वायू निर्मिती प्रकल्पांपैकी दोन प्रकल्प लवकरच सुरू होणार आहेत, असं त्यांनी यावेळी सांगितलं. यामुळे भारताचं तेल, मिथेनॉल आणि अमोनिया यांच्यावरील अवलंबित्व कमी होणार आहे. इंधन वायू निर्मिती प्रकल्पाद्वारे युरिया तसंच इतर रसायनांची निर्मिती होईल, त्यामुळे शेतकऱ्यांचाही फायदा होईल, असं दुबे म्हणाले.

**<><><><><>**

मानवाधिकारांच्या जतन आणि संवर्धनासाठी भारत वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे.  आंतरराष्ट्रीय मानवाधिकार दिनानिमित्त आज नवी दिल्लीत आयोजित राष्ट्रीय परिषदेत त्या बोलत होत्या. माणूसपणाचा हक्क निर्विवाद आणि अबाधित राहिला पाहजे, असं सांगून त्या म्हणाल्या की न्याय्य, समताधारित, आणि संवेदनक्षम समाजव्यवस्था तयार करण्यासाठीची मशागत मानवाधिकार दिवस कार्यक्रमांमधून होत असते. देशात न्याय हा देखील जन्मसिद्ध हक्क असला पाहिजे, असं त्या म्हणाल्या.

**होल्ड बाईट...**

**<><><><><>**

महाराष्ट्रात सर्व इलेक्ट्रिक वाहनांना शासनाने जाहीर केलेली टोलमाफी येत्या आठ दिवसात लागू करण्यात यावी आणि निर्णय लागू केल्यापासून आजवर वसूल झालेली टोल रक्कम परत करावी, असे निर्देश अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी आज महाराष्ट्र विधानसभेत दिले. प्रश्नोत्तराच्या तासात ते बोलत होते. याबाबतचा प्रश्न शंकर जगताप यांनी उपस्थित केला होता. त्यावर वरुण सरदेसाई यांनी उपप्रश्न विचारले. सर्व संबंधित टोल नाक्यांवर टोल न घेण्याच्या सूचना आठ दिवसात देण्यात याव्यात. अशा वाहनांसाठी राज्यभर चार्जिंग स्टेशन वाढवा आणि त्यांच्या क्षमतेत देखील वाढ करा, अशा सूचना अध्यक्षांनी यावेळी दिल्या.

वाढवण बंदर ते समृद्धी महामार्ग दरम्यान होणाऱ्या नवीन रस्त्याची लांबी १८२ किलोमीटर वरून १०४ किलोमीटर इतकी कमी करण्याचं नियोजन करण्यात येत आहे. हा रस्ता ६५ गावातून जाईल अशी माहिती मंत्री दादा भुसे यांनी संबंधित प्रश्नाच्या उत्तरात दिली. दारूची दुकानं स्थलांतरित करण्यासाठी संबंधित इमारतीचा ना हरकत दाखला घेणं अत्यावश्यक करण्यात येईल, अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावरच्या प्रश्नाच्या उत्तरात केली. मूळ प्रश्न पिंपरी चिंचवड शहरातल्या एका दुकानाबाबत शंकर जगताप यांनी उपस्थित केला होता.

राज्यात गेल्या सहा वर्षांत भटक्या कुत्र्यांनी चावा घेतल्याच्या ३० लाखांहून जास्त घटनांची नोंद झाली आहे. तर २०२१ ते २०२३ या काळात रेबीजमुळे ३० जणांना आपले प्राण गमवावे लागले, अशी माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत दिली. एका प्रश्नाच्या लेखी उत्तरात शिंदे म्हणाले की, स्थानिक पातळीवरच्या संबंधित संस्थांना श्वानांचं निर्बिजीकरण आणि रेबीज प्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम करण्याचे निर्देश देण्यात आले आहे. मुंबई, पुणे, नागपूर, कल्याण-डोंबिवलीसारख्या प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या संख्येबद्दल चिंता व्यक्त करताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार सुनील प्रभू यांनी प्रश्न विचारला होता.

<><><><><>

गडचिरोली इथं आज ११ जहाल नक्षलवाद्यांनी महाराष्ट्राच्या पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांच्यासमोर आत्मसमर्पण केलं. त्यांच्यावर एकंदर ८२ लाख रुपयांचं बक्षीस होतं. विभागीय समितीच्या दोन सदस्यांचाही यात समावेश आहे. यावेळी रश्मी शुक्ला यांनी जहाल नक्षलवादी भूपती याच्या शरणागतीत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या सी-६० कमांडोंचा सत्कार केला आणि त्यांच्या कामगिरीचं कौतुक केलं. तसंच उर्वरित नक्षवाद्यांनाही शस्त्रं टाकून आत्मसमर्पण करायचं आवाहन केलं.

<><><><><>

इंडिगो विमान कंपनीच्या उड्डाणांमध्ये गेल्या काही काळापासून निर्माण झालेल्या अनियमिततेबाबत दिल्ली उच्च न्यायालयात आज सुनावणी झाली. या अनियमिततेमुळे अडकून पडलेल्या प्रवाशांसाठी सरकारनं उचललेली पावलं, वैमानिकांच्या कामाच्या वेळेबाबतचे नियम लागू करण्यात झालेला विलंब आणि इंडिगोच्या कर्मचाऱ्यांच्या वर्तणुकीबाबत न्यायालयानं सरकारला प्रश्न विचारले. इतर विमान कंपन्यांनी या परिस्थितीत तिकिटं ४ ते ५ हजारावरून ३० हजार रुपयांपर्यंत नेऊन प्रवाशांना धारेवर धरलं, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं.

<><><><><>

दक्षिण गोव्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी पर्यटन स्थळांवर विविध प्रकारचे फटाके, आतिशबाजी करणारी उपकरणं, ज्वालाग्रही पदार्थ यांच्यावर बंदी घालणारा आदेश जारी केला आहे. ही बंदी सर्व नाईटक्लब, बार आणि रेस्टॉरंट्स, हॉटेल्स, गेस्टहाऊस, बीच शॅक, तात्पुरता निवारा, कार्यक्रम स्थळं तसंच मनोरंजनासाठीच्या स्थळांना लागू करण्यात आली आहे. गोव्यात आरपोरा इथं नुकत्याच झालेल्या नाईटक्लब दुर्घटनेत २५ जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर ही बंदी जारी करण्यात आली आहे.

नाताळ आणि नवीन वर्षाच्या स्वागतासाठी गोव्यात होणारी पर्यटकांची गर्दी लक्षात घेऊन सर्वत्र कडक सुरक्षा उपाययोजना सुनिश्चित करण्याच्या सूचना मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी दिल्या आहेत. आज त्यांनी विविध प्रशासकीय अधिकाऱ्यांबरोबर उच्चस्तरीय बैठक घेतली. उपाययोजना करण्यात कोणताही हलगर्जीपणा न करण्याचे आदेश मुख्यमंत्री सावंत यांनी दिले आहेत.

<><><><><>

ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालच्या मुलांना समाजमाध्यम वापरावर बंदी लागू झाली आहे. ऑस्ट्रेलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानीज यांनी यंदा सप्टेंबर महिन्यात या बंदीविषयीची घोषणा केली होती. हा नियम आजपासून लागू झाला. आता या मुलांना फेसबुक, इन्स्टाग्राम, युट्युब, थ्रेड्स, एक्स, स्नॅपचॅट, किक, रेडीट, टिकटॉक ही माध्यमं वापरता येणार नाहीत. माहितीचा अतिरेकी वापर रोखणं, मानसिक ताण, एकटेपणा आणि अतिवापरामुळे होणाऱ्या नकारात्मक परिणामांपासून मुलांचं संरक्षण व्हावं या उद्देशाने ही बंदी घालण्यात आली आहे. नियमांचा भंग केल्यास संबंधित समाज माध्यम चालवणाऱ्या कंपन्यांवर ३ कोटी २० लाख डॉलर्सचा दंड आकारण्यात येणार आहे.

//<><><><><>//